प्रेसनोट दि. २३/१०/२०१८

**शिवाजीनगर, पुणे येथील कोर्टातील वकीलावर फायरींग करणारे दोन संशयीतांस गुन्हे शाखेकडून १६ तासाच्या आत केली अटक**

दि. २२/१०/२०१८ रोजी इसम नामे ॲड. देवानंद रत्नाकर ढोकणे, वय ४२ वर्षे, रा. कामराजनगर, येरवडा पुणे हे आपले कोर्टाचे काम उरकून आपले रहाते घरी त्यांच्या वॅगनार कार मधून संगमवाडी रोडने घरी जात असतांना मोटार सायकलवरील दोन अज्ञात इसमांनी रात्री २०:३० वा.चे सुमारास त्यांचेवर दोन गोळया झाडून त्यांना जखमी करून ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. सदर ठिकाणी तात्काळ अती वरीष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देवून सदर गंभीर गुन्हयाच्या तपासाबाबत मा. अपर पोलीस आयुक्त श्री देशपांडे सो. व मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री शिरीष सरदेशपांडे सो. तसेच सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, श्री समीर शेख यांनी मार्गदर्शक सुचना दिल्या नंतर लागलीच गुन्हे शाखेची वेगवेगळी पथके तयार करुन तात्काळ आरोपींचा शोध घेण्याच्या सुचना दिल्या असता गुन्हे शाखा युनिट १ पुणे शहरचे अधिकारी व कर्मचारी यांनी तपास सुरु केला असता, सदरच्या अज्ञात आरोपींबाबत युनिट १ चे पोलीस नाईक सचिन जाधव व श्रीकांत वाघवले यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदर गोळीबार करणारे दोन इसम पुणेकडून नाशिक रोडने मोटार सायकलवरुन गेले बाबत माहिती मिळाली. असता युनिट १ च्या अधिकारी व स्टाफ यांनी आरोपींचा शोध घेवून कायदेशीर कारवाई चालू केली.

त्यावेळी युनिट १ कडील पो.उप.निरी. दिनेश पाटील व स्टाफ यांनी आरोपींची गुप्त बातमीदाराकडून माहिती काढली असता, सदरचे आरोपी हे दोंदे गांव, ता. खेड, जि.पुणे येथील शेतात लपून बसले बाबत माहिती मिळालेने लागलीच बातमीप्रमाणे सदर ठिकाणी अचानक छापा टाकून आरोपी नामे १) कुरूमदास काळुराम बढे, वय ३३ वर्षे, रा. कालूस, पवळेवाडी, ता. खेड, जि.पुणे व त्याचा साथीदार विधीसंघर्षात बालक त्याचे बरोबर मिळून आला. त्यावेळी त्यांचेकडे सखोल चौकशी करता आरोपी क्र. १ याने त्याचेजवळील गावठी देशी बनावटीच्या पिस्टलाने दोन गोळया नमुद जखमी इसमावर झाडलेबाबतची कबूली दिली. व त्याचे बरोबर असलेला विधीसंघर्षीत बालक हा मोटार सायकल चालवत असलेबाबत सांगून त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबूली दिली आहे. सदर बाबत येरवडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७६४/२०१८ भादवि कलम ३०७, ३४ आर्म्स ॲक्ट ३ सह २५ म.पो.का.कलम ३७(०१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे सो. पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितीन भोसले पाटील. पो.निरी. रघुनाथ जाधव, खंडणी विभाग, पो.निरी. दिनकर मोहिते, युनिट ३, पो.निरी. गजानन पवार, युनिट २, पो.निरी. दिपक लगड, वाहन चोरी पथक, पो.उप निरी. दिनेश पाटील, पो.ना. श्रीकांत वाघवले, सचिन जाधव, इम्रान शेख, सुधाकर माने, पो.हवा. रिजवान जिनेडी, प्रकाश लोखंडे, अशोक माने, प्रशांत गायकवाड, तुषार माळवदकर, सुभाष पिंगळे, सागर तोरडमल, चंद्रकांत गुरव, उमेश काटे, तुषार खडके, संजय बरखडे, इरफान मोमीन, गजानन सोनुने, यांनी केली आहे.

